## महिला व पुरुष संघाचे संघ व्यवस्थापक पदाकरिता अर्हता :-

अ. संघाबरोबर व्यवस्थापक म्हणून कमीत कमी ०५ वर्षाचा अनुभव (संघ / जिल्हा / विद्यापीठ / राज्य / व्यावसायीक संघ) असणे आवश्यक आहे.

ब. रजिस्टर कबड्डी संस्थेचे चारित्र्य प्रमाणपत्र संबधीत व्यक्तीबाबत असणे आवश्यक आहे. (सदरची अट बंधनकारक आहे.)

क. शासकीय किंवा निमशासकीय संघाबरोबर व्यवस्थापक पदावर काम केल्याचा अनुभव असल्यास प्राधान्य.

## कर्तव्य व महत्वाच्या सूचना खालीलप्रमाणे : -

१. सरावा दरम्यान तसेच स्पर्धे दरम्यान प्रत्येक खेळाडू शिस्तीत व नियमानूसार वर्तणूक करतो किंवा कसे ? याबाबतची जबाबदारी व्यवस्थापकाची असेल.

२. जर एखादा खेळाडू गैरवर्तन करत असेल, सतत गैरहजर रहात असेल, तर त्याची त्या दिवसाची हजेरी मस्टरला गैरहजरी लावून त्याचे विनावेतन करणे.

३. संघ स्पर्धेकरीता बाहेरगावी जाणार असेल त्यावेळेस पुरुष संघ व्यवस्थापक व महिला संघ व्यवस्थापक यांनी त्याच्या संघाचे रेल्वे आरक्षण स्वतः जाऊन करावे.